I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 173 B.N.S.S)**

## प्रथम खबर अहवाल
**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

1. **District (जिल्हा):** गोंदिया **P.S. (पोलीस ठाणे):** रावनवाडी **Year (वर्ष):** 2025

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0002 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 02/01/2025 04:10 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** मधले दिवस **Date from (दिनांक पासून):** 23/12/2024 **Date To (दिनांक पर्यंत):** 01/01/2025

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 13:55 तास **Time To (वेळेपर्यंत):** 16:06 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 02/01/2025 **Time (वेळ):** 03:40 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 003 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 02/01/2025 03:40 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पूर्व, 10 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** ग्राम कार्या व लहरी रेस्टॉरंट, कामठा ,गोंदिया

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्‌दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

District (State) (जिल्हा (राज्य)):

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): श्री. रामलाल सोमा वाघाडे

(b) Father's Name (चे नाव ): सोमा वाघाडे

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1971

(d) Nationality (राष्ट्रीयत्व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कामठा, गोंदिया, रावनवाडी, गोंदिया, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | कामठा, गोंदिया, रावनवाडी, गोंदिया, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल क्र.): 91-9049364881

**7.** **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रमोद बिरसिंह उपवंषी | | वडील चे नाव : बिरसिंह उपवंषी | 1. गजानन मंदिरजवळ,गजानन कॉंलोनी,Town/Village (शहर / गाव): शारदा नगर कुडवा,Tehsil (तहसील): गोंदिया,Police Station (पोलीस ठाणे): रावनवाडी,District (जिल्हा): गोंदिया,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | धनंजय मुन्नालाल तांडेकर | | वडील चे नाव : मुन्नालाल तांडेकर | 1. नवरगांव रोड,कामठा,Town/Village (शहर / गाव): कामठा,Tehsil (तहसील): गोंदिया,Police Station (पोलीस ठाणे): रावनवाडी,District (जिल्हा): गोंदिया,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 3 | विष्वनाथ गोविंदराव तरोणे | | वडील चे नाव : गोविंदराव तरोणे | 1. लहरी आश्रम रोड,Town/Village (शहर / गाव): कामठा,Tehsil (तहसील): गोंदिया,Police Station (पोलीस ठाणे): रावनवाडी,District (जिल्हा): गोंदिया,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8.** **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

पो.स्टे ला तक्रार प्राप्त होताच

**9.** **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | कार्बन कंपनिचा मोबाईल फोन | 300.00 |
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | विवो कंपनीचा Y21 मॉडेल मोबाईल | 3,000.00 |
| 3 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | विवो कंपनिचा V27 मॉडेल चा मोबाईल | 4,000.00 |
| 4 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | सि.डी. प्लेअर | 32GB क्षमतेचे सँनडिस्क कंपनितचे 4मेमोरी कार्ड | .00 |
| 5 | कागदपत्रे आणि मुल्‍ यवान रोखे | इतर कोणतीही कागदपत्रे | तक्रारदार यांचे प्रधानमंत्री आवास योजनेचे कागदपत्र | .00 |
| 6 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | पाचशे रू कि.मी च्या 20चलनी नोटा | 10,000.00 |
| 7 | इतर | घरगुती वस्‍ तु | आरोपी क्र.3यांचे लोवर फुल पँन्ट | .00 |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 17,300.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया
दिनांक:-01.01.2025

नांवः- श्री. रामलाल सोमा वाघाडे, वय-54 वर्ष, व्यवसाय- षेती, रा. कामठा, पो. कामठा, ता.जि. गोंदिया मो. क्र. 9049364881.

मी आज दिनांक 01/01/2025 रोजी समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, उपरोक्त पत्त्यावर आपले कुटूंबासह राहतो आणि शेत मजुरीचे कामे करतो. मी, दि. 23/12/2024 रोजी पोलीस निरीक्षक श्री. उमाकांत उगले, ला.प्र.वि गोंदिया यांचे समक्ष एका लोकसेवकाविरुध्द लाच मागणी

संबधाने तक्रार नोंदविली आहे, ती तक्रार खालील प्रमाणे आहे,

मी दोन ते चार वर्षापुर्वी ग्राम पंचायत कामठा यांच्या मार्फतीने प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुल मंजुर करण्यासाठी अर्ज केला होता. त्यानंतर मला घरकुल मंजुर झाल्याबाबत ग्रामपंचायत चे चपराषी धनंजय यांनी सांगीतले. मला माहे सप्टेंबर/2024 मध्ये घरकुलाचा पहिला हप्ता 15,000/- रु. माझ्या कामठा येथील पोष्ट ऑफीसच्या खात्यावर जमा झाले. त्यानंतर मला धनंजय यांनी घरकुलाचे बांधकाम चालु करण्यासाठी ज्युनीअर इंजीनीअर यांनी कळविले असल्याचे सांगीतले. त्यानंतर मी माझे घरकुलाचे बांधकाम चालु केले. माझ्या घरकुलाच्या पाया भरणीचे काम पुर्ण झाल्यावर तसे ग्राम पंचायतचे चपराषी श्री. धनंजय यांना दिनांक 24/11/2024 रोजी सांगीतले. त्यांनतर दिनांक 27/11/2024 रोजी मी गाई सांभाळण्या साठी शेतात गेलो होतो.सायंकाळी शेतातुन घरी आल्यावर माझा मुलगा नामे सुनिल रामलाल वाघाडे वय-33 वर्ष यांनी सांगीतले की, तो घरी असतांना ज्युनियर इंजीनियर उपवंषी साहेब, पंचायत समिती गोंदिया व ग्रामपंचायत चपराषी धनंजय हे घरी आले होते व त्यांनी झालेल्या बांधकामाचे फोटो काढले व माझ्या मुलाला घरकुलाचे अनुदानाची रक्कम रु. 15,000/- माझ्या पोष्ट ऑफीस मधील खात्यात वर्ग केल्याबद्दल व उर्वरीत अनुदानांची रक्कम वर्ग करण्याच्या मोबदल्यात रु. 10,000/- दयावे लागतील असे सांगीतले.

दि. 21/12/2024 रोजी सांयकाळी मी माझे घरी असताना ज्युनीअर इंजीनीअर श्री उपवंषी पंचायत समीती गोंदीया यांचा फोन आला व म्हणाले की, तुमच्या घरकुलाच दुस-या कीस्तचे रु.70,000/- तुमच्या खात्यावर जमा झाले आहेत. तुम्हाला सांगीतल्याप्रमाणे रु. 10,000/- ग्रामपंचायत चपराषी धनजंय कडे जमा करा. मी माहिती घेतली असता ज्युनीअर इंजीनिअर श्री. उपवंषी हे घरकुलाचे अनुदान जमा केल्याच्या मोबदल्यात मागत असलेले 10,000/- ही कायदेषीर फि नसुन लाच रक्कम असल्याचे कळाले.

ज्युनिअर इंजिनीअर श्री. उपवंषी पंचायत समिती गोंदिया बांधकाम विभाग हे घरकुलाचे अनुदान माझ्या पोष्टाचे बचत खात्यात जमा केल्याच्या मोबदल्यात व बाकी अनुदानाची रक्कम जमा करण्यासाठी मागत असलेले रु. 10,000/- ही लाच रक्कम असल्याने त्यास लाच देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने श्री. उपवंषी व ग्रामपंचायत कार्यालय कामठा येथील चपराषी धनंजय यांच्याविरुध्द तक्रार देण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया येथे आलो आहे. तरी पंचायत समिती गोंदिया बांधकाम विभाग येथील ज्युनिअर इंजिनीअर श्री. उपवंषी व ग्रामपंचायत कार्यालय कामठा येथील चपराषी धनंजय यांचे विरुध्द कायदेषीर कार्यवाही होण्यास विंनती आहे. मला वाचता व लिहीता येत नसल्याने मी माझी तक्रार तोंडी देत आहे. माझी तक्रार संगणकावर टंकलिखीत केल्यानंतर प्रिंट काढुन मला वाचुन दाखविली असता ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे. माझे ज्युनिअर इंजिनीयर श्री उपवंषी साहेब व ग्रामपंचायत कार्यालय कामठा येथील चपराषी धंनजय यांचेषी कसलेही वैमनस्य व आर्थीक देवान-घेवान नाही. पोलीस निरीक्षक श्री. उमाकांत उगले यांनी माझी तोंडी तक्रार घेतल्यानंतर दोन शासकीय पंचांना पाचारण करुन पंच क्र. 1 श्री. गौरव कैलाष चैरसीया, वय- 32 वर्ष, पद- फिल्टर ऑपरेटर, मेकॅनीक विभाग, नगर परिषद गोंदिया, रा. बर्फ फॅक्टरीच्या मागे, गणेष नगर गोंदिया, ता.जि. गोंदिया. व पंच क्र. 2 श्री. किषोर बाबुलाल ऊके,

वय- 53 वर्ष, पद- कनिष्ठ लिपीक टॅक्स विभाग, नगर परिषद गोंदिया, रा. चिचटोली गजानन का ॅलोनी, कुडवा, गोंदिया, ता.जि. गोंदिया. यांची माझेषी ओळख करुन दिली व दोन्ही पंचांना माझे तक्रारीची थोडक्यात हकीकत सांगुन मी सांगीतलेली तक्रार त्यांना वाचावयास दिली. दोन्ही पंचानी मी सांगीतलेली तक्रार वाचुन मला त्याबाबत विचारणा करुन त्यावर स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. उमाकांत उगले यांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. उमाकांत उगले यांच्या सांगण्यावरुन मी सापळा कार्यवाहीत वापरण्यात येणारी लाच रक्कम रु. 10,000/- ज्यामध्ये 500 रुपये दराच्या 20 चलनी नोटा त्यांच्याकडे जमा केल्या. त्यानंतर त्यांनी लाच रकमेला लावण्यात येणा-या अँथ्रासीन पावडरची वैषिष्टे सांगुन त्या नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्याचे प्रात्यक्षिक त्यांच्या अधिनस्त कर्मचारी यांच्या हस्ते पंचासमक्ष करुन दाखवुन त्या नोटांना अँथ्रासीन पावडर लावुन त्या नोटा एका लिफाफ्यात टाकुन लिफाफा पंचासमक्ष सिलबंद करुन ट्रप सुटकेस मध्ये सुरक्षित ठेवुन दिला.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. उमाकांत उगले यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी त्यांचे कार्यालयीन व्हाईस रेकॉर्डर कषा प्रकारे काम करतो याबाबत मला व पंचांना सविस्तर माहीती देवुन एक नविन मेमोरी कार्ड सॅनडिस्क कंपनीचा 32 जीबी क्षमतेचा ज्याचा सिरीयल क्र. 4185YVFRY4AT असा असलेला पंचासमक्ष काढुन व्हाईस रेकॉर्डर मध्ये टाकले. व्हाईस रेकार्डर मला व दोन्ही पंचाना दाखवुन व्हाईस रेकार्डर आणि मेमरी कार्डमध्ये कोणत्याच प्रकारची पुर्वीची व्हाईस रेकार्डीग फाईल नसल्याबाबत खात्री करुन दिली. सदर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यामध्ये तक्रारदार व गैरअर्जदार यांचे आवाज कषा पध्द्तीने रेकार्ड करण्यात येते व व्हाईस रेकार्डर कषा पध्दतीने बंद करण्यात येतो याबाबत मला व दोन्ही पंचाना समजावुन सांगीतले. त्यानंतर व्हाईस रेकार्डर व मेमरीकार्ड मध्ये कोणत्याही प्रकारची रेकॉर्डर फाईल नसल्याची पुन्हा खात्री करुन देवुन सदर व्हाईस रेकार्डर बंद करुन सुस्थितीत सापळा बॅगमध्ये सुरक्षित ठेवुन दिले.

मी पोलीस निरीक्षक उमाकांत उगले यांना दोन्ही पंचासमक्ष सांगीतले कि, गै.अ. ज्युनिअर इंजिनीअर श्री. उपवंषी पंचायत समिती गोंदिया बांधकाम विभाग हे पंचायत समिती गोंदिया येथे हजर मिळतील असे सांगितल्यावरुन सदर गै.अ. यांचे विरुध्दची लाच मागणी पडताळणी कार्यवाही पंचायत समिती गोंदिया येथे करण्याचे तसेच पंचायत समिती गोंदिया हे ला.प्र.वि कार्यालया पासुन अंदाजे 2 कि.मी. अंतरावर असल्याने गै.अ. यांचेविरुध्दची कार्यवाही ला.प्र.वि कार्यालयातुनच करण्याचे सर्वानुमते ठरविले व पुढील कार्यवाही विषयी सर्वांना समजावुन सांगुन लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान घेण्यात येणा-या दक्षतेबाबत सुचना समजावुन सांगीतल्या.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री उमाकांत उगले यांचे सुचनेवरुन पंच क्र. 1 गौरव कैलाष चैरसीया यांनी माझी अंगझडती घेवुन त्याबाबतची अंगझडतीची यादी तयार करण्यात आली. अंगझडती दरम्यान हजर केलेले सामान मला वेळीच परत करुन त्यावर माझी सही घेतली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री उमाकांत उगले यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी टॅªप सुटकेसमधुन सुस्थितीत करुन ठेवुन असलेले सोनी कंपनीचे ICD-PX470 कार्यालयीन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर

बाहेर काढले व वेळ 13.45 वाजता सुरु करुन पंच क्र. 1 व माझे आवाजात लाच मागणी पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याबाबतचे संभाषण ध्वनिमुद्रित करून ते व्हाईस रेकॉर्डर कापडी पिषवित ठेवुन माझे गळयामध्ये शर्टचे आत दोरीने लटकवुन दिले.

त्यानंतर मला व पंच क्र. 1 यांना ला.प्र.वि. गोंदिया कार्यालयातुन माझे मोटार सायकल क्र. एम.एच.35/ए.सी. 2693 ने गै.अ. ज्युनिअर इंजिनीअर श्री. उपवंषी पंचायत समिती गोंदिया बांधकाम विभाग यांचेषी लाच मागणी संबंधाने बोलणी करण्याकरीता बांधकाम विभाग, पंचायत समिती कार्यालय गोंदिया येथे पाठविण्यात आले. पंच क्र. 2 व सापळा पार्टीतील सर्व सदस्य ला.प्र.वि. कार्यालयातच थांबुन राहीले.

मी पंचायत समिती कार्यालय गोंदिया बांधकाम विभाग येथुन पंच क्र. 1 यांचेसह ला.प्र.वि. कार्यालयात परत आलो. पोलीस निरीक्षक उमाकांत उगले यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनिस्त कर्मचारी यांनी माझे गळयात असलेले व्हाईस रेकॉर्डर बाहेर काढुन पंच क्र. 1 यांचे आवाजात वेळ 14.17 वाजता बंद केले. व्हाईस रेकॉर्डर च्या मेमोरी कार्ड मधील PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये फाईल 241223_1345.mp3 रेकॉर्डर झाल्याचे दिसुन आले. त्यानंतर पोलीस निरीक्षक उमाकांत उगले यांचे सांगणेप्रमाणे मी पंच क्र. 1 यांच्यासोबत गै.अ. ज्युनिअर इंजिनीअर श्री. उपवंषी, पंचायत समिती गोंदिया बांधकाम विभाग यांना भेटण्याकरीता पंचायत विभाग, पंचायत समिती कार्यालय गोंदिया येथे गेलो असता गै.अ. ज्युनिअर इंजिनीअर श्री. उपवंषी पंचायत समिती गोंदिया बांधकाम विभाग हे त्यांचे कार्यालयात हजर मिळुन आले नाही. आम्ही काहीवेळ त्यांची वाट बघितली असता ते पंचायत समिती कार्यालयात आले नसल्याचे आम्हाला माहिती मिळाली. करीता मी पंच क्र. 1 यांचेसह परत आलो आहे.

त्यानंतर आम्ही लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील मेमरी कार्डच्या PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मधील फाईल 241223_1345.mp3 ध्वनिमुद्रीत संभाषण दोन्ही पंचांसमक्ष रिव्हर्स व फारवर्ड करून ऐकले व ऐकविले असता सदर फाईल मध्ये माझे गै.अ. यांच्यासोबत कसल्याही प्रकारचे संभाषन झाले नसल्याचे दिसुन आले. त्यानंतर ते मेमरी कार्ड पुनष्चः उदयीक दिवषी गै.अ. त्यांचे कार्यालयात हजर मिळुन येताच लाच मागणी पडताळणी कार्यवाही वेळी वापरण्याचे सर्वानुमते ठरवुन सदरचे मेमरी कार्ड त्यांचे मुळ आवरणामध्ये ठेवुन एका कागदी लिफाफ्यात ठेवले. त्यावर पोलीस निरिक्षक उमाकांत उगले व दोन्ही पंचांनी सहया करुन तो लिफाफा कार्यालयीन सिलने तात्पुरते सिलबंद केला व सापळा बॅगमध्ये सुरक्षित ठेवुन दिले. त्यानंतर मी पोलीस निरिक्षक उमाकांत उगले व दोन्ही पंचासमक्ष सांगीतले कि, दिनांक 24.12.2024 व दिनांक 25.12.2024 रोजी माझे महत्वाचे काम असल्याने दिनांक 24.12.2024 व दिनांक 25.12.2024 रोजी मला गै.अ. उपवंषी यांचेकडे न पाठवता दिनांक 26.12.2024 रोजी पाठविण्यात यावे अषी विनंती केली. त्यावरुन गै.अ. यांचे विरुध्दची लाच मागणी पडताळणी दिनांक 26.12.2024 रोजी त्यांचे कार्यालयात पाठवुन करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. मला या दरम्यानच्या कालावधीत गै.अ यांचा फोन वगैरे आल्यास पोलीस निरिक्षक उमाकांत उगले यांना त्वरीत कळवुन आमचे सुचनेप्रमाणे पुढील कार्यवाही करण्याचे व या कारवाईबाबत कोठेही व्याच्यता

न करता गोपनियता राखण्याची सुचना देवुन मला दिनांक.26.12.2024 रोजी सकाळी 10.00 वा. कार्यालयात हजर येण्याचे सांगुन मला माझे घरी जाणेस रवाना केले. याबाबतच्या सविस्तर नोंदी पोलीस निरिक्षक उमाकांत उगले यांनी पंचनामा क्र. 1 मध्ये घेतलेल्या आहेत.

पोलीस निरिक्षक उमाकांत उगले यांनी पंचनामा क्र. 01 प्रमाणे दिलेल्या सुचनेनुसार मी दिनांक 26.12.2024 रोजी ला.प्र.वि कार्यालयात हजर आलो. दोन्ही पंच व पोलीस निरिक्षक उमाकांत उगले व त्यांचे पथक कार्यालयात हजर होते. मला व दोन्ही पंचांना पंचनामा कार्यवाही 1 मध्ये दिलेल्या सुचना पुनष्चः समजावुन सांगीतल्या व पंच क्र. 2 यांना त्यांनी सतत सापळा पार्टी सोबत राहून कार्यवाहीचे अवलोकन करण्याच्या सुचना दिल्या.

त्यानंतर पोलीस निरिक्षक उमाकांत उगले यांचे सुचनेवरुन पंच क्र.1 यांनी माझी अंगझडती घेवुन त्याबाबतची यादी तयार करण्यात आली व अंगझडती दरम्यान हजर केलेले सामान मला वेळीच परत करुन त्यावर माझी सही घेतली.

त्यानंतर पोलीस निरिक्षक उमाकांत उगले यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी सोनी कंपनीचे ICD-PX470 कार्यालयीन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये पंचनामा कार्यवाही क्र. 1 मध्ये वापरलेला सॅनडिस्क कंपनीचा 32 जी.बी. क्षमतेचा, सिरीयल क्र. 4185YVFRY4AT असलेला मेमोरी कार्ड टॅप सुटकेसमधील लिफाफ्यातुन बाहेर काढुन व्हाईस रेकॉर्डर मध्ये टाकुन सुस्थितीत केले व वेळ 15.56 वाजता सुरु करुन पंच क्र. 1 व माझे आवाजात लाच मागणी पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याबाबतचे संभाषण ध्वनिमुद्रित करून ते व्हाईस रेकॉर्डर कापडी पिषवित ठेवुन माझे गळयामध्ये शर्टचे आत दोरीने लटकवुन दिले. त्यानंतर मला पंच क्र. 1 यांचेसह ला.प्र.वि. गोंदिया कार्यालयातुन माझे मोटार सायकल क्र. एम.एच.35/ए.सी. 2693 ने गै.अ. ज्युनिअर इंजिनीअर श्री. उपवंषी पंचायत समिती गोंदिया बांधकाम विभाग यांचेषी लाच मागणी संबंधाने बोलणी करण्याकरीता बांधकाम विभाग, पंचायत समिती कार्यालय गोंदिया येथे पाठविण्यात आले. पंच क्र. 2 व सापळा पार्टीतील सर्व सदस्य ला.प्र.वि. कार्यालयातच थांबुन राहीले.

मी गै.अ.यांचेषी बोलणी करून पंच क्र. 1 यांचेसह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया येथे परत आलो. पोलीस निरीक्षक उमाकांत उगले यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांचे हस्ते माझे गळयात असलेले व्हाईस रेकॉर्डर बाहेर काढुन पंच क्र. 1 यांचे आवाजात वेळ 16.26 वाजता बंद केले. व्हाईस रेकॉर्डर च्या मेमोरी कार्ड मधील PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1मध्ये फाईल 241226_1556.mp3 रेकॉर्डर झाल्याचे दिसुन आले.

मी, पंच क्र. 1 यांचेसोबत गै.अ. ज्युनिअर इंजिनीअर श्री. उपवंषी पंचायत समिती गोंदिया बांधकाम विभाग यांना भेटण्याकरीता पंचायत विभाग, पंचायत समिती कार्यालय गोंदिया येथे गेलो असता गै.अ. ज्युनिअर इंजिनीअर श्री. उपवंषी पंचायत समिती गोंदिया बांधकाम विभाग हे त्यांचे कार्यालयात हजर मिळुन आले नाही. आम्ही काहीवेळ त्यांची वाट पाहिल्यानंतर मी माझे मोबाईल क्र. 9049364881 वरुन फोन चे स्पिकर सुरु करुन गै.अ. यांचे मोबाईल क्र. 8999632675 वर फोन लावुन कामठयावरुन वाघाडे बोलत असल्याचे सांगुन ऑफीस मध्ये भेटायला आले असल्याचे

सांगीतले असता गै.अ. यांनी ते बाहेर असल्याचे सांगुन दो तिन दिन थोडासा घरमे प्रॉब्लेम है ईसलिए थोडासा बाहर हु, असे बोलले, त्यानंतर गै.अ. यांनी वो बोले थे क्या मस्टर के लिए रोजगार सेवकको असे म्हंटले असता मी त्यांना अभीतक नही बोला अभी बोलुंगा जाके आज असे म्हंटले, त्यावर गै.अ. यांनी नही बोलोगे तो बिल नही निकलेगें, अगर मस्टर निकलता है तो ही बिल निकालुंगा मै आगे ठिक है असे म्हंटले, गै.अ. ज्युनिअर इंजिनीअर श्री. उपवंषी पंचायत समिती गोंदिया बांधकाम विभाग हे आपले कार्यालयाचे बाहेर असल्याने व त्यांच्यासोबत माझे फोनवरील संभाषनामध्ये त्यांनी दो तिन दिनोसे थोडासा घरमे प्रॉब्लम है इसलीये थोडासा बाहर हु असे बोलल्याने  पंच क्र. 1 यांचेसह परत आलो

त्यानंतर पोलीस निरीक्षक उमाकांत उगले यांनी लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान डिजीटल व्हाईस रेकॉर्डर च्या मेमरी कार्डच्या PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये 241226_1556.mp3 मध्ये माझे व गै.अ. ज्युनिअर इंजिनीअर श्री. उपवंषी यांचे फोनव्दारे  रेकॉर्ड झालेले संभाषण दोन्ही पंचासमक्ष ऐकले व दोन्ही पंचांना ऐकविले. तसेच माझे व गै.अ यांच्यात झालेल्या संभाषणावरुन गै.अ. हे दोन तिन दिवसानंतर त्यांचे कार्यालयात हजर झाल्यानंतर ते घरकुलाचे मंजुर अनुदान माझे खात्यावर टाकल्याचे बदल्यात मागत असलेले रु. 10,000/-  लाचेची मागणी करु शकतात अषी माझी, पोलीस निरीक्षक उमाकांत उगले व दोन्ही पंचाची खात्री झाली. गै.अ. उपवंषी हे आपल्या कार्यालयात हजर झाल्यानंतर माझ्याकडे त्यांची असलेली लाच मागणी पडताळणी कार्यवाही कार्यालयीन वेळेत करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. याबाबतच्या सविस्तर नोंदी पोलीस निरिक्षक उमाकांत उगले यांनी पंचनामा क्र. 2 मध्ये घेतलेल्या आहेत.

मी दिनांक 30.12.2024 रोजीचे वेळ 10.30 वा. सुमारास ला.प्र.वि कार्यालयात गेलो तेथे पोलीस निरीक्षक उमाकांत उगले हजर होते. दिनांक 27.11.2024 रोजी ज्युनियर उपवंषी साहेब पंचायत समिती गोंदिया व ग्रामपंचायत चपराषी धंनजय हे माझे घरी आले होते त्यांनी झालेल्या बांधकामाचे फोटो काढले व घरकुलाची रक्कम काढुन दिल्याच्या मोबदल्यात रु. 10,000/- दयावे लागतील असे बोलल्याने मी गै.अ ग्रामपंचायत चपराषी धंनजय यांचेषी बोलणी करण्यास त्यांचेकडे गेल्यास ते माझेकडुन लाचेची मागणी करु शकतात अथवा ते गै.अ. उपवंषी यांना ग्रामपंचायत कार्यालय कामठा येथे बोलवुन त्यांचेषी माझी बोलनी करवुन देवु शकतात असे सांगुन गै.अ. यांचेविरुध्दची लाच मागणी पडताळणी कार्यवाही ग्रामपंचायत कार्यालय कामठा येथे जावुन करण्याची विनंती केली. आमचे विनंतीवरुन पोलीस निरीक्षक श्री. उमाकांत उगले यांनी तात्पुरते कार्यमुक्त केलेल्या दोन्ही पंचाना ला.प्र.वि. कार्यालयात बोलावुन घेतले. मला व दोन्ही पंचांना लाच मागणी पडताळणी वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना पुनष्चः समजावुन सांगीतल्या व पंच क्र. 2 यांना त्यांनी सतत सापळा पार्टी सोबत राहून कार्यवाहीचे अवलोकन करण्याची सुचना दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक उमाकांत उगले यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी टॅप सुटकेसमध्ये  सुस्थितीत करुन ठेवुन असलेले सोनी कंपनीचे ICD-PX470 कार्यालयीन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाहेर काढले व्हाईस रेकार्डर सुरु करुन त्यात कोणत्याही प्रकारची व्हाईस रेकॉर्डर फाईल नसल्याची पंचानी व आम्ही खात्री केली. त्यानंतर प्लॉस्टीक आवरणात बंद असलेले 32 जिबी क्षमतेचे सॅनडिस्क मायक्रो एसडी असे छापील नाव असलेले सिरीयल क्र. 2445XV06224W चे मेमरीकार्ड पंचासमक्ष काढुन सोनी कंपनीचे ICD-PX470 डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये टाकले. व्हाईस रेकार्डर मला व दोन्ही पंचाना दाखवुन

व्हाईस रेकार्डरचे इंटरनल मेमरी आणि मेमरी कार्डमध्ये कोणत्याच प्रकारची पुर्वीची व्हाईस रेकार्डींग फाईल नसल्याबाबत दोन्ही पंचानी व मी खात्री केली. व सदरचे व्हाईस रेकार्ड सुस्थितीत सापळा बॅगमध्ये सुरक्षीत ठेवुन दिला.

मला ग्राम कामठा शेत शिवारात वेळ 13.30 वा सुमारास हजर राहण्याचे सांगुन माझे मोटार सायकलने रवाना केले. त्यानंतर पोलीस निरीक्षक उमाकांत उगले हे दोन्ही पंच व सापळा पथकासह ग्राम कामठा शेतषिवार येथे हजर आलेत. मी, पोलीस निरीक्षक उमाकांत उगले व त्यांचे पथकांनी आप-आपले वाहन कोणाच्याही नजरेस पडणार नाहीत असे नजरे आड ठेवले.

त्यानंतर पोलीस निरिक्षक उमाकांत उगले यांचे सुचनेवरुन पंच क्र. 1 यांनी माझी अंगझडती घेवुन त्याबाबतची यादी तयार करण्यात आली व अंगझडती दरम्यान हजर केलेले सामान मला वेळीच परत करुन त्यावर माझी सही घेतली.

त्यानंतर पोलीस निरिक्षक उमाकांत उगले यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी ट्रप सुटकेस मध्ये सुस्थितीत ठेवुन असलेला सोनी कंपनीचे ICD-PX470 कार्यालयीन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर ट्रॅप सुटकेसमधुन बाहेर काढुन वेळ 14.04 वाजता सुरु करुन पंच क्र. 1 व माझे आवाजात लाच मागणी पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याबाबतचे संभाषण ध्वनिमुद्रित करून ते व्हाईस रेकॉर्डर कापडी पिषवित ठेवुन माझे गळयामध्ये शर्टचे आत दोरीने लटकवुन दिले. त्यानंतर मला पंच क्र. 1 यांचेसह कामठा शेतषिवारातुन माझे मोटार सायकल क्र. एम.एच.35/ए.सी. 2693 ने ग्रामपंचायत चपराषी धनंजय यांना भेटण्याकरीता ग्रामपंचायत कार्यालय कामठा येथे पाठविण्यात आले. पंच क्र. 2 व सापळा पार्टीतील सर्व सदस्य कामठा शेतषिवारात थांबुन राहीले.

मी गै.अ. ग्रामपंचायत चपराषी धनंजय यांचेषी बोलणी करून पंच क्र. 1 यांचेसह पोलीस निरीक्षक उमाकांत उगले व सापळा पथक थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो. पोलीस निरीक्षक उमाकांत उगले यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी माझे गळयात असलेले व्हाईस रेकॉर्डर बाहेर काढुन पंच क्र. 1 यांचे आवाजात वेळ 16.30 वाजता बंद केले. व्हाईस रेकॉर्डरच्या मेमोरी कार्ड मधील PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये फाईल 241230_1404.mp3 रेकॉर्ड झाल्याचे दिसुन आले. मी पंच क्र. 1 यांचे सोबत ग्रामपंचायत चपराषी धंनजय यांना भेटण्याकरीता ग्रामपंचायत कार्यालय कामठा येथे गेलो असता त्या ठिकाणी धनंजय दिसुन आल्याने त्यांना ग्रामपंचायतच्या दरवाज्या जवळुन धनंजय, धनंजय असा आवाज देवुन आव तो इधर थोडा दो मिनट बात करना था कब से जग रहा हु, असे म्हटल्याने धनंजय हे ग्रामपंचायतचे बाहेर आले त्यांचेषी बोलणी केली असता धनंजय यांनी पुढील बोलणी करण्यास मला सायंकाळी त्यांचे घरी बोलविल्याने मला ग्रामपंचायत चपराशी धनंजय यांचेकडे सायंकाळी पाठविण्याचे सर्वानुमते ठरवुन आम्ही सर्व त्यांच ठिकाणी थांबुन राहिलो.

ग्रामपंचायत चपराशी धनंजय यांनी मला सायंकाळी त्यांचे घरी भेटण्यास बोलविल्याने पोलीस निरीक्षक उमाकांत उगले यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी व्हाईस रेकॉर्डर वेळ 18.24 वाजता सुरु करुन माझे व पंच क्र. 1 यांचे आवाजात लाच मागणी पडताळणी कार्यवाही करीता

जात असल्याबाबतचे संभाषण ध्वनिमुद्रित करून ते व्हाईस रेकॉर्डर कापडी पिषवित ठेवुन माझे गळयामध्ये शर्टचे आत दोरीने लटकवुन दिले. त्यानंतर मला पंच क्र. 1 यांचेसह कामठा शेतषिवारातुन माझे मोटार सायकल क्र. एम.एच.35/ए.सी. 2693 ने ग्रामपंचायत चपराषी धंनजय यांना भेटण्याकरीता ग्रामपंचायत कार्यालय कामठा येथे पाठविण्यात आले. पंच क्र. 2 व सापळा पार्टीतील सर्व सदस्य कामठा शेतषिवारात थांबुन राहीले.

मी ग्रामपंचायत चपराशी धनंजय यांचेषी बोलणी करून पंच क्र. 1 यांचेसह सापळा पथक थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो. पोलीस निरीक्षक उमाकांत उगले यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी माझे गळयात असलेले व्हाईस रेकॉर्डर बाहेर काढुन पंच क्र. 1 यांचे आवाजात वेळ 18.40 वाजता बंद केले. व्हाईस रेकॉर्डर च्या मेमोरी कार्ड मधील PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये फाईल 241230_1824.mp3 रेकॉर्ड झाल्याचे दिसुन आले.

मी पंच क्र.1 यांचे सोबत ग्रामपंचायत चपराशी धनंजय यांचे घरी गेलो असता ते घरी हजर मिळुन न आल्याने मी धनंजय यांचे घरुन त्यांचा मोबाईल क्रमांक घेवुन आपले मोबाईलचा स्पिकर सुरु करुन त्यांचेशी बोलणी केली असता त्यांनी जभी उपवंषी को फोन लगाया था ओ ऑफीस मे बिजी थे मै उंसे सुबह बात करुंगा बोले, थोडा ऑफीस मे बिजी था, कल आता हु ग्यारा बजे ग्रामपंचायत मे असे म्हटले, गै.अ. उपवंषी हे दिनांक 31.12.2024 रोजी 11.00 वा सुमारास ग्रामपंचायत कार्यालय कामठा येथे येणार असल्याचे सांगीतल्याने गै.अ. यांचेविरुध्दची लाच मागणी पडताळणी कार्यवाही दिनांक 31.12.2024 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरवुन मला दिनांक 31.12.2024 रोजीचे 10.00 वा. याच ठिकाणी हजर राहण्याचे व सदर कार्यवाहीबाबत गोपनियता ठेवण्याबाबत सुचना देवुन माझे घरी जाण्यास रवाना केले. याबाबतच्या सविस्तर नोंदी पोलीस निरिक्षक उमाकांत उगले यांनी पंचनामा क्र. 3 मध्ये घेतलेल्या आहेत.

मी पोलीस निरीक्षक उमाकांत उगले यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे दिनांक 31.12.2024 रोजी कामठा शेतषिवारात हजर असता पोलीस निरीक्षक उमाकांत उगले हे दोन्ही पंच व सापळा पथकासह वेळ 12.30 वा. हजर आलेत. सर्वानी आप-आपले वाहन कोणाच्याही नजरेस पडणार नाहीत असे नजरे आड ठेवले. पोलीस निरीक्षक उमाकांत उगले यांनी मला सांगीतले कि, सदर कार्यवाहीतील पंच क्र. 1 गौरव कैलाष चैरसीया यांची प्रकृती बरी नसल्याने ते औषधोपचार कामी दवाखान्यात गेले असुन त्यांचेऐवजी पंच म्हणुन हजर झालेले श्री अभिषेक महेंद्र बोरकर वय-41 वर्ष पद- लिपीक नगर परिषद गोंदिया, रा. आंबेडकर चैक, सुर्याटोला गोंदिया ता. जि. गोंदिया यांचा माझेषी परिचय करुन देवुन माझीच एका लोकसेवकाविरुध्द तक्रार असल्याचे त्यांना सांगीतले. श्री. किषोर बाबुलाल ऊके यांना पंच क्र. 1 तर श्री अभिषेक महेंद्र बोरकर यांना पंच क्र. 2 म्हणुन नेमण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर सापळा पथक, मला व दोन्ही पंचाना लाच मागणी पडताळणी कार्यवाही वेळी घेण्यात येणा-या दक्षतेबाबत सुचना पुनष्चः समजावुन सांगीतले.
त्यानंतर पोलीस निरिक्षक उमाकांत उगले यांचे सुचनेवरुन पंच क्र. 1 यांनी माझी अंगझडती घेवुन त्याबाबतची यादी तयार करण्यात आली व अंगझडती दरम्यान हजर केलेले सामान मला वेळीच

परत करुन त्यावर माझी सही घेतली.

त्यानंतर पोलीस निरिक्षक उमाकांत उगले यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी ट्रप सुटकेस मध्ये सुस्थितीत ठेवुन असलेला सोनी कंपनीचे ICD-PX470 कार्यालयीन डिजीटल व्हाईस रेकॉंर्डर ज्यात 32 जिबी क्षमतेचे सॅनडिस्क कंपनीचे सिरीयल क्र. 3443DVCG22KK चे मेमरी कार्ड असलेला व्हाईस रेकॉर्डर  ट्रॅप सुटकेसमधुन बाहेर काढुन वेळ 13.07 वाजता सुरु करुन पंच क्र. 1 व माझे आवाजात लाच मागणी पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याबाबतचे संभाषण ध्वनिमुद्रित करून ते व्हाईस रेकॉर्डर कापडी पिषवित ठेवुन माझे गळयामध्ये शर्टचे आत दोरीने लटकवुन दिले. त्यानंतर मला पंच क्र. 1 यांचेसह कामठा शेतषिवारातुन माझे मोटार सायकल क्र. एम.एच.35/ए.सी. 2693 ने गै.अ. ज्युनियर इंजिनीयर उपवंषी व ग्रामपंचायत चपराषी धंनजय यांना भेटण्याकरीता ग्रामपंचायत कार्यालय कामठा येथे पाठविण्यात आले. पंच क्र. 2 व सापळा पार्टीतील सर्व सदस्य कामठा शेतषिवारात थांबुन राहीले.

”मी पंच क्र. 1 यांचे सोबत गै.अ. ज्युनियर इंजिनीयर उपवंषी व ग्रामपंचायत चपराषी धंनजय यांना भेटण्याकरीता ग्रामपंचायत कार्यालय कामठा येथे गेलो असता त्या ठिकाणी ग्रामपंचायत चपराशी धनंजय मिळुन आले त्यांना मी आले असल्याचे सांगीतले, त्यावर धंनजय यांनी ज्युनियर इंजिनीयर उपवंषी कामठयात आले असल्याचे सांगुन इथेच दहा मिनट थांबण्यास सांगीतले. काही वेळाने ज्युनियर इंजिनीयर उपवंषी आले असता मी उपवंषी साहेब नमस्कारजी असे बोलल्याने उपवंषी यांनी चलो आवो चाय पियो, पंचायत समिती कायको आतेतो बारबार, असे म्हणुन ग्रामपंचायत जवळील हाँटेलमध्ये चहा पिण्यास मी व चपराषी धनंजय असे तिघेही गेलो. ग्रामपंचायत चपराषी धनंजय यांनी गै.अ. उपवंषी यांना इनका क्या है, देखो किस्तका असे बोलुन तेथे हजर असलेल्या योगी यांना तुम्ही जा ना थोडा पर्सनल बात आहे असे बोललो तर योगी यांनी करो, करो, असे म्हणुन बाहेर निघुन गेला. त्यानंतर गै.अ. उपवंषी यांनी मला थोडा आतमध्ये येवुन बोला असे म्हणले असता, मी दहा हजारामध्ये काहीना काही तुम्हाला कमी करावे लागेल आम्ही गरीब माणसं आहोत असे म्हणले असता गै.अ. उपवंषी यांनी टेषंन मत लो, टेंषन दुर करो लेकीन मैने डायरेक्ट भैया को बोल दिया कम ना ज्यादा इतने मे निपटा देंगे काम खत्म करो, अब मेरेको बताव इतना करने के बाद आप के फोन पे भी हमने काम कर दिया, ईसे ज्यादा क्या, हमारे से आस कर सकते हो, त्यावर मी, सर एक दोन कमी करुन घ्या, त्यावर गै.अ. उपवंषी यांनी आँलरेडी मैने पहीलेच खत्म कर दिया हु पिक्चर बोलनेवाली कोई बातच नही रखा जो भी करना था सिधे आपके यहा के भैया के सामने बोल दिया, त्यावर मी दहाच्या कमी नाही का असे म्हटले असता, गै.अ. उपवंषी यांनी पहीले ज्यादा बोलना था क्या ये बताव, असे म्हटल्यावर मी सर ठिक आहे मग उदया परवा पैसे कोणाकडे तुमच्याकडे आणुन देवु का यांचेकडे देवु, त्यावर गै.अ. उपवंषी यांनी न ईसके पास ना मेरे पास, तरोणे काका के पास दे देना, मेरेको फोन नही करने का जो भी है ठिक है, असे म्हटले.

गै.अ. ज्युनियर इंजिनीयर उपवंषी यांनी माझे मंजुर घरकुलाची अनुदांनाची रक्कम माझे पोष्टाचे बचत खात्यामध्ये जमा केल्याचे मोबदल्यात व उर्वरीत अनुदानाची रक्कम काढुन देण्याचे मोबदल्यात रु. 10,000/- लाच रक्कमेची मागणी करुन ती लाच रक्कम तरोणे यांचेकडे देण्यास

सांगुन सदर लाच रक्कम माझे कडुन प्राप्त करण्याचा प्रयत्न केल्याची तसेच गै.अ. ग्रामपंचायत चपराशी धनंजय यांनी गै.अ. ज्युनियर इंजिनीयर उपवंषी यांना तक्रारदार यांचे किस्त का क्या है तो देखो असे म्हणुन माझेकडुन लाच रक्कम प्राप्त करुन घेण्यास सहकार्य केल्याची पंचाची व पोलीस निरीक्षक उमाकांत उगले यांची खात्री झाली. त्यानंतर लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान डिजीटल व्हाईस रेकॉर्डर च्या मेमरी कार्डच्या PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये 241231_1307.mp3 मध्ये माझे व गै.अ. ज्युनियर इंजिनीयर उपवंषी व ग्रामपंचायत चपराशी धनंजय यांचे रेकॉर्ड झालेले संभाषण दोन्ही पंचासमक्ष ऐकले व दोन्ही पंचांना ऐकविले. गै.अ. यांचेविरुध्दची सापळा कार्यवाही दिनांक 01.01.2025 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरवुन मला 10.00 वा. याच ठिकाणी हजर राहण्याचे व सदर कार्यवाहीबाबत गोपनियता ठेवण्याबाबत सुचना देवुन माझे घरी जाण्यास रवाना केले. याबाबतच्या सविस्तर नोंदी पोलीस निरिक्षक उमाकांत उगले यांनी पंचनामा क्र. 4 मध्ये घेतलेल्या आहेत.

मी पोलीस निरीक्षक उमाकांत उगले यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे दिनांक 01.01.2025 रोजी कामठा शेतषिवारात हजर असता पोलीस निरीक्षक उमाकांत उगले हे दोन्ही पंच व सापळा पथकासह वेळ 10.15 वा. हजर आलेत. त्या सर्वांनी आप-आपले वाहन कोणाच्याही नजरेस पडणार नाहीत असे नजरे आड ठेवले. त्यानंतर सापळा पथक, मला व दोन्ही पंचाना सापळा कार्यवाही वेळी घेण्यात येणा-या दक्षतेबाबत सुचना समजावुन सांगीतले.

त्यानंतर पोलीस निरिक्षक उमाकांत उगले यांचे सुचनेवरुन पंच क्र. 1 यांनी माझी अंगझडती घेवुन त्याबाबतची यादी तयार करण्यात आली व अंगझडती दरम्यान हजर केलेले सामान मला वेळीच परत करुन त्यावर माझी सही घेतली.

गै.अ. ज्युनियर इंजिनीयर उपवंषी यांनी माझे मंजुर घरकुलाची अनुदांनाची रक्कम माझे पोष्टाचे बचत खात्यामध्ये जमा केल्याचे मोबदल्यात व उर्वरीत अनुदानाची रक्कम काढुन देण्याचे मोबदल्यात रु. 10000/- लाच रक्कमेची मागणी करुन ती लाच रक्कम तरोणे यांचेकडे देण्यास सांगुन सदर लाच रक्कम माझे कडुन प्राप्त करण्याचा प्रयत्न केल्याची तसेच गै.अ. ग्रामपंचायत चपराशी धनंजय यांनी गै.अ. ज्युनियर इंजिनीयर उपवंषी यांना माझे किस्तचे क्या है, तो देखो असे म्हणुन माझे कडुन लाच रक्कम प्राप्त करुन घेण्यास सहकार्य केल्याने अँथ्रासीन पावडर लावलेल्या रू. 500/- दराचे 20 चलनी नोटा असे एकुण रू. 10,000/- चा लाच रक्कमेचा लिफाफा पोलीस निरीक्षक उमाकांत उगले यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी ट्रॅप सुटकेसमधुन बाहेर काढुन त्यातील रु.500/- दराचे 20 चलनी नोटा असे एकुण रु. 10,000/- लाच रक्कम लिफाफ्यातुन काढुन सदरची लाच रक्कम माझे फुलपँटचे समोरील उजवे खिषात ठेवुन दिली.

त्यानंतर प्लास्टीक आवरणात बंद असलेले 32 जिबी क्षमतेचे सॅनडिस्क मायक्रो एसडी असे छापील नाव व सिरीयल क्र. 4185YVFRY491 असलेला एक नविन मेमरी कार्ड पंचासमक्ष बाहेर काढुन सदर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये टाकले. व्हाईस रेकार्डर मला व दोन्ही पंचाना दाखवुन व्हाईस रेकार्डरचे इंटरनल मेमरी आणि मेमरी कार्डमध्ये कोणत्याच प्रकारची पुर्वीची व्हाईस रेकार्डींग फाईल नसल्याबाबत खात्री केली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक उमाकांत उगले यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी वेळ 15.42 वा. व्हाईस रेकार्ड सुरु करुन त्यामध्ये माझे व पंच क्र. 1 यांचे आवाजात गै.अ. ज्युनियर इंजिनीयर उपवंषी व ग्रामपंचायत चपराशी धनंजय यांनी मागणी केलेली लाच रक्कम देण्याकरीता जात असल्याचे संभाषण ध्वनिमुद्रित करून ते व्हाईस रेकॉर्डर कापडी पिषवित ठेवुन माझे गळयात दोरीचे सहायाने शर्टचे आत लटकवुन मलाव पंच क्र. 1 यांना आम्ही थांबुन असलेल्या ठिकाणाहुन माझे खाजगी मोटार सायकलने लाच रक्कम देण्याकरीता कामठा चैकातील तरोणे काका यांचेकडे त्यांचे  चहा दुकानात जाणेकरीता रवाना करण्यात आले. माझे पाठोपाठ पोलीस निरीक्षक उमाकांत उगले, हे सापळा पथक व पंच क्र. 2, यांचेसह ग्राम कामठा चैकाजवळ पोहचुन आप-आपले वाहन कोणालाही संषय येणार नाही अषा स्थितीत रोडचे बाजुला उभे करुन माझे नियोजीत ईषा-याची वाट पाहत थांबले. मी कामठा चैकातील लहरी रेस्टारेंट येथे पंच क्र. 1 यांचे सोबत गेलो तिथे तरोणे व ग्रामपंचायत चपराषी धनंजय बसुन होते.मी ग्रामपंचायत चपराषी धनंजय यांना देवुन देवु का म्हणते त्यावर धनंजय यांनी मान हालवुन ईषाÚयाने तरोणे यांचकडे देण्यास सांगीतल्याने मी रु. 10,000/- तरोणे यांना दिले. व तरोणे यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा मी पंच क्र. 1 यांचे सोबत रेस्टारेंटच्या बाहेर रोडवर येवुन तरोणे काका यांनी लाच रक्कम स्विकारल्याबाबतचा नियोजीत ईषारा केला. मी केलेला नियोजित ईषारा पाहुन पोलीस निरीक्षक यांनी आपल्या सापळा पथकासह तिथे आलेत मला पोलीस निरीक्षक उमाकांत उगले यांनी लाच रक्कम कोणी स्विकारली व कुठे ठेवली याबाबत ईषाराने विचारले असता मी लहरी रेस्टॉरेट मध्ये हजर असलेल्या इसमाकडे बोट दाखवुन यांनीच लाच रक्कम स्विकारली असल्याचे सांगितले व त्यांचे शेजारी बसुन असलेले इसम हे गै.अ. ग्रामपंचायत चपराशी धनंजय असल्याचे सांगीतल्याने ग्रामपंचायत चपराषी धनंजय व तरोणे यांना ताब्यात घेवुन तरोणे यांचेकडुन लाच रक्कम हस्तगत केली व मला त्या ठिकाणाहुन थोडया अंतरावर जावुन थांबण्यास सांगितले.

त्यानंतर मला जवळ बोलावुन पोलीस निरीक्षक उमाकांत उगले यांचे सुचनेवरुन त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांनी माझे गळ्यात लटकविलेले व्हाईस रेकॉर्डर बाहेर काढुन त्यामध्ये पंच क्र. 1 यांचे आवाजात सापळा कार्यवाही पुर्ण झाल्याबाबत संभाषण ध्वनीमुद्रीत करुन व्हाईस रेकॉर्डर 16.06 वाजता बंद केले. व्हाईस रेकॉर्डर च्या मेमोरी कार्डच्या PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये फाईल 250101_1542.mp3 रेकॉर्ड झाल्याचे दिसुन आले. याबाबतच्या सविस्तर नोंदी पोलीस निरीक्षक उमाकांत उगले यांनी पंचनामा क्र. 5 मध्ये घेतल्या आहेत.

तरी आरोपी प्रमोद बिरसिंह उपवंषी वय-38 वर्ष पद- गृहनिर्माण अभियंता (कंत्राटी), पंचायत समिती गोंदिया, ह.मु. चुन्नीलालजी बिसेन यांच्या घरी किरायाने, शारदा नगर, गजानन मंदिरजवळ, गजानन कॉलोनी कुडवा ता.जि. गोंदिया, मुळ पत्ता पिपरटोला,पो. दवनिवाडा, ता.जि. गोंदिया यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन तक्रारदार यांचे घरकुलाचे अनुदानाचा हप्ता पोष्टाचे बचत खात्यात जमा केल्याचे तसेच उर्वरीत अनुदानाचा हप्ता काढुन देण्याचे मोबदल्यात रु. 10,000/- लाच रक्कमेची मागणी करुन ती लाच रक्कम आरोपी विष्वनाथ गोविंदराव तरोणे वय 62 वर्ष, धंदा- हॉटेल व्यवसाय, रा. लहरी आश्रम रोड, कामठा पो. कामठा, ता.जि. गोंदिया. यांचेकडे देण्यास

सांगीतले व आरोपी धनंजय मुन्नालाल तांडेकर वय 46 वर्ष, पद षिपाई ग्रामपंचायत कामठा, रा. नवरगांव रोड, कामठा, पो. कामठा, ता.जि. गोंदिया. यांनी सदर लाच रक्कम मागणी व स्विकारण्याकरीता सहकार्य करुन आरोपी विष्वनाथ गोविंदराव तरोणे यांचे मार्फत स्वतःचे आर्थिक लाभा करीता पंचासमक्ष रु. 10,000/- लाच रक्कम स्विकारुन गैरफायदा घेतला आहे. म्हणुन माझी त्यांच्याविरुध्द कायदेषिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखित केली असुन मला वाचुन दाखविले माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** VAIBHAV SHRIRANG PAWAR (पोलीस उपनिरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**Name (नाव):** VAIBHAV SHRIRANG PAWAR

**Rank (हुद्‌दा):** SI (Sub-Inspector)

**No. (क्र.):** 15101000402VSPM8701L

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्‌दा क्र. ७ ला जोडपत्र)

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen ) (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्‍ या/पाहिलेल्‍ या) शारीरिक वैशिष्‍ टये, व्‍ यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्‍ मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्‍ या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1987 | | - | | **चेचक:** क्र. |
| 2 | पुरुष | 1979 | | - | | **चेचक:** क्र. |
| 3 | पुरुष | 1963 | | - | | **चेचक:** क्र. |

| Deformities / Peculiarities (व्‍ यंग वैशिष्‍ टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्‍ या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**

**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)**